# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि०७/०५/२०१८.

## प्रेस नोट

**२४ तासांच्या आत चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीकडून १,९४,०००/-रु.जप्त करून जेरबंद- गुन्हे शाखेची कामगिरी.**

दि.०७/०५/२०१८:- गुन्हे शाखेचे सफौ.नंदकुमार भंडारे हे पथकासह आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस स्टेशन जवाहर नगर येथील चोरीच्या गुन्ह्यातील इसम चोरीची रक्कम व्हिल्हेवाट लावण्यासाठी गजानन नगर, पहाडे चौक येथून जाणार आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्याने गुन्हे शाखेच्या पथकाने नमूद ठिकाणी जाऊन सापळा लावून आरोपी नामे उमेश रमेश गाडेकर रा.गल्ली नं.७, पुंडलिक नगर, औरंगाबाद यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने कळविले कि, दि.०५/०५/२०१८ रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास जालना रोडवरील अपना बाजार कॉम्प्लेक्स जवळ एका कुरिअरचे दुकानासमोर ठेवलेल्या जेवणाच्या डब्यामधील २,००,०००/-रु.ची रक्कम चोरी केल्याचे कबुल केले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळील पिशवीत १,९४,०००/-रु. मिळून आल्याने जप्त केले.

याबाबत पोलीस स्टेशन अभिलेख तपासला असता पोलीस स्टेशन जवाहर नगर येथे ७६/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे दाखल असल्याचे समजल्यावरून आरोपीस गुन्ह्याचे पुढील तपासकामी पोलीस स्टेशन जवाहर नगर पोलिसांच्या ताब्यात दिले.

सदर कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.मिलिंद भारंबे, मा.पोलीस उप आयुक्त(परिमंडळ-२) श्री.राहुल श्रीरामे, सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे)श्री.रामेश्वर थोरात सहायक पोलीस निरीक्षक श्री.घनश्याम सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सफौ.नंदकुमार भंडारे, साईनाथ महाडिक, पोहेकॉ/ फारुख देशमुख, संजय धुमाळ, पोकॉ/ विकास माताडे, अफसर शहा,यांनी बजावली आहे.

SD/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर